# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.05.2026** **वारः गुरुवार**

1. खरीपाच्या 14 पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याला केंद्रिय मंत्रीमंडळाची मंजुरी
2. राज्यातल्या सर्व मंत्र्याच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याचा निर्णय
3. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं अनावरण
4. सीबीआयकडून नीट प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणी सहा संशयितांना अटक आणि
5. राज्यात आज काही ठिकाणी पावसाची तर काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यता

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

आर्थिक व्यवहारविषयक मंत्रीमंडळ समितीनं खरीपाच्या 14 पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याला मंजुरी दिली आहे. केंद्रिय मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांना मंत्रीमंडळाच्या निर्णयांची माहिती दिली.

शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची चांगली किंमत मिळावी यासाठी हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. यंदाच्या हंगामात 824 लाख मेट्रीक टनांपेक्षा जास्त शेतमालाची खरेदी होईल अशी अपेक्षा असल्याचं वैष्णव म्हणाले. सूर्यफुलाच्या बिया, कापूस आणि तीळ या पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे.

दगडी कोळशापासून इंधन वायू तयार करण्याच्या प्रकल्पांना चालना देण्यासाठी 37 हजार 500 कोटी रुपयांच्या योजनेला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या योजनेमुळे खाण उद्योगातून 6 हजार 300 कोटी रुपयांचा महसूल निर्माण होईल तसंच सध्याच्या भूराजकीय परिस्थितीत आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमांना मदत मिळेल असं वैष्णव यांनी सांगितलं. या योजनेमुळं कोळसा खाण क्षेत्रात सुमारे 50 हजार रोजगार निर्माण होणं अपेक्षित असल्याचं ते म्हणाले.

**<u>नागपूर विमानतळ</u>**

नागपूर विमानतळ अद्ययावत आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर हा प्रकल्प राबवण्यात येईल. विमानतळाच्या जमिनीची भाडेपट्ट्याची मुदतही वाढवण्यात आली आहे.
मिहान प्रकल्पाच्या अंतर्गत या विमानतळाला प्रादेशिक विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या दिशेनं हा निर्णय महत्त्वाचा आहे.

**<u>काटकसर</u>**

इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतर्गत प्रवासादरम्यानच्या आपल्या ताफ्यातल्या वाहनांची संख्या कमी केली आहे. नुकत्याच केलेल्या गुजरात आणि आसामच्या दौऱ्यात त्यांनी वाहनांची संख्या मर्यादित ठेवली होती.

दरम्यान पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत उच्चस्तरीय बैठक घेऊन सर्व मंत्र्याच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला. सुरक्षिततेशी तडजोड न करता मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनसंख्येवर मर्यादा आणली जाणार आहे. याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**प्रत्येक व्यक्तीला थोडं थोडं आपली जीवनशैली जर बदलली तरी देखील आपण देशाला मदत करू शकू. सहा महिन्याकरता जर प्रधानमंत्री मोद्यांनी देशवासियांना आव्हान केलं आहे तर मला विश्वास आहे आपले देशवासी त्या बाबतीत मदतच करतील. वैश्विक संकटात जर आपण देशाच्या पाठीशी उभं राहिलो नाही तर हे योग्य होणार नाही. महाराष्ट्रामध्ये देखील**

**आम्ही निर्णय केलेला आहे. मुख्यमंत्र्यांसहित मंत्र्यांचे कॉन्व्हॉय हे छोटे आम्ही करतो आहोत. विदेश यात्रांवर अधिकारी असतील किंवा मंत्री असतील निर्बंध आम्ही आणतो आहोत. ज्या ज्या गोष्टींमध्ये परकीय चलन खर्च होतं त्या त्या गोष्टींची खपत कशी? कमी करता येईल याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत वेगवेगळ्या पद्धतीनं आपल्याला आपल्या देशी गोष्टींना कसा त्या ठिकाणी एक बढावा देता येईल असा प्रयत्न देखील आम्ही करतो आहोत हे एका दिवसात होणार नाहीये पण आपण सगळ्यांनी मिळून प्रयत्न केला तर निश्चितपणे आपण हे पूर्ण करू शकतो.**

**कुंभ मेळा बोधचिन्ह**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यातील आखाड्यांना सर्व सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटी रुपये निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. लहान संस्थानसाठी प्रत्येकी 15 लाख रुपये, आखाड्यांच्या वीज देयकांचा प्राधिकरणाच्या माध्यमातून भरणा, आखाड्याची जमीन शासकीय कामासाठी अधिग्रहित केल्यास आखाड्यांना मोबदला किंवा जमीन देण्याची घोषणाही त्यांनी केली. सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत ते काल बोलत होते. कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

यावेळी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं.

या बोधचिन्हात नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या भौगोलिक आणि धार्मिक परंपरा दर्शवण्यात आल्या आहेत.

या बोधचिन्हासाठी कुंभमेळा प्राधिकरणानं स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेतल्या पहिल्या तीन विजेत्यांचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**नीट अटक**

केंद्रिय अन्वेषण विभागानं नीट प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणी सहा संशयितांना अटक केली आहे. त्यातील तीन जण जयपूरचे, एक गुरुग्रामचा आणि एक नाशिकचा आहे. इतर अनेक संशयितांचीही चौकशी सुरू असून सीबीआयनं काल देशातल्या विविध शहरांमध्ये छापे टाकले. त्यात संशयास्पद साधनं आणि मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

**नीट कारवाई**

दरम्यान, याप्रकरणी अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील धनंजय लोखंडे या युवकाला सीबीआयनं अटक केली असून काल त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. त्यानंतर लोखंडे याला सीबीआयचे अधिकारी दिल्लीला घेऊन गेले.
लोखंडेसोबत इतर दोघांनाही सीबीआयनं ताब्यात घेतलं होतं मात्र त्यांची चौकशी करून त्यांना सोडून देण्यात आलं.

**सीबीएसई निकाल**

केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. यंदा या परीक्षेत 85 टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात उत्तीर्ण मुलींचं प्रमाण मुलांपेक्षा साडेसहा टक्क्यांनी अधिक आहे.

**उर्जामंत्री**

राज्यातल्या सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर संयंत्र बसवण्याचं काम प्राधान्यानं पूर्ण करावं तसंच प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीनं पूर्ण करावेत असे निर्देश अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण नियामक मंडळाच्या वार्षिक बैठकीत ते काल पुण्यात बोलत होते. सामाजिक उत्तरदायित्व निधीद्वारे सौर प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा असंही त्यांनी या बैठकीत सांगितलं.

**नितेश राणे**

जंजिरा किल्ला राज्यातल्या पर्यटनच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचा वारसा असून पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी तसंच सुविधा वाढीसाठी इथला ब्रेकवॉटर भिंत आणि प्रवासी जेटी प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल असं मत मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केलं. मुरुड तालुक्यातील जंजिरा किल्ला परिसरात महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पाच्या लोकार्पण

सोहळ्यात ते काल बोलत होते. या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होऊन परिसरातील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बॅडमिंटन**

बँकॉकमध्ये होत असलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पीव्ही सिंधूनं महिला एकेरीच्या तर लक्ष्य सेन आणि किदम्बी श्रीकांत यांनी पुरुष एकेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

मिश्र दुहेरीत मात्र भारताच्या अशिथ, अमृता आणि ध्रुव, तनिशा या दोन्ही जोड्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

**भारत्तोलन**

गुजरातमध्ये गांधीनगर इथं सुरू असलेल्या वरीष्ठ गटाच्या आशियाई अजिंक्यपद भारत्तोलन स्पर्धेत काल भारताच्या ज्ञानेश्वरी यादवनं दोन पदकं मिळवली. 53 किलो वजनी गटात तिनं स्नॅच प्रकारात रौप्य पदक पटकावलं. तर एकंदर 194 किलो वजन उचलून तिनं स्पर्धेच्या दुसऱ्या एका प्रकारात कास्य पदक मिळवलं.

**परिवहन मंत्री**

खासगी प्रवासी बसची बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाइल ऍप्सद्वारे होणारी आर्थिक पिळवणूक यावर दीर्घकालीन उपाययोजना सुचवण्यासाठी एक विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. या समितीत सहपरिवहन आयुक्त आणि सुराज्य अभियानातील तीन प्रतिनिधींचा समावेश असेल. कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांची लूट खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**पाऊस-सातारा,भंडारा**

सातारा शहरासह इतर भागात काल वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे उष्म्यानं हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. मात्र आंब्यासह इतर फळपिकांचं मोठं नुकसान झालं.

कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात काल सायंकाळी सहानंतर वीजांसह जोरदार पाऊस झाला. रात्री पावसाच्या सरी पडत होत्या.

भंडारा जिल्ह्यातही काल पाऊस झाला. शेतात कापून ठेवलेलं धान वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ उडाली.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल तर तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं असेल. तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल आणि रात्रीचं तापमान सामान्यपेक्षा अधिक असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
## नमस्कार.